No. of Printed Pages : 4

**एफ.एम.टी.-01**

# BDP / BCA / BTS

## मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम

## सत्रांत परीक्षा

01695

**जून, 2019**

**पाठ्यक्रम कोड : एफ.एम.टी.-01**

*वेळ : दोन तास* *अधिकतम गुण : 50*

***सूचना : सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.***

**1.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : *10*

(a) सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व

(b) मला आवडलेले पुस्तक

(c) पर्यावरण रक्षणाची गरज

(d) रोजगार आणि युवक

**2.** खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : *8*

(a) संत तुकारामांच्या मते विष्णुलोकी चे संतजन इहलोकी अवतार का घेतात ?

(b) केशवसुत कवींचा महिमा कसा वर्णन करतात ?

(c) मर्ढेकरांच्या काव्यशैलीची वैशिष्ट्ये कोणती ?

(d) 'कातरवेळ' या कथेतील अक्काचे, माहेरी घरच्यांकडून कसे स्वागत झाले ?

3. खालीलपैकी कोणत्याही *दोन* प्रश्नांची उत्तरे लिहा : 6

(a) 'वळीव' या कथेत पाऊस येण्यापूर्वीच्या उकाडयाचे कसे वर्णन केले आहे ?

(b) प्रल्हादाचा चेलम्यावरील प्रसंग हा संपूर्ण दलित समाजाच्या परिस्थितीचे चित्रण करणारा कशा प्रकारे आहे ?

(c) शिरवाडकरांनी आकाशाला 'अलौकिक मौनिबाबा' असे का म्हटले आहे ?

(d) 'सांबर' या एकांकिकेत कुंजाच्या मनाची सहृदयता कशी प्रगट झाली आहे ?

4. खालीलपैकी कोणत्याही *एका* विषयावर टीपा लिहा : 6

(a) 'गुंड्याभाऊचे दुखणे' या कथेतील विनोदाची वैशिष्ट्ये

(b) अक्षर वाङ्मयाचे अक्षरत्व

(c) लोकशाहीतील नागरिकांच्या जबाबदाऱ्या

(d) स्त्री-मुक्ती चळवळीची गरज

5. चतुर्थी आणि षष्ठी या विभक्तींचे प्रत्यय सांगून त्यांच्या एकवचनाचे प्रत्येकी एक उदाहरण द्या. 5

**किंवा**

खालीलपैकी *एका* कल्पनेचा सुमारे सहा ते आठ ओळींत विस्तार करा :

(a) जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती

(b) प्रयत्नांती परमेश्वर

(c) बळी तो कान पिळी

**6.** खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा : *3*

(a) पाणी पाजणे

(b) मूग गिळणे

(c) सतीचे वाण

(d) एरंडाचे गुऱ्हाळ

(e) साडेसाती

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(a) चोराच्या मनात चांदणं

(b) गरज सरो वैद्य मरो

(c) झाकली मूठ सव्वा लाखाची

(d) काही गुण सोन्याचा काही सोनाराचा

(e) चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे

**7.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा : *4*

(a) भाऊराव पाटिलांनी स्वावलंबी शिक्षणाची योजना का सुरू केली ?

(b) आर्थिक स्वातंत्र्य ही स्त्री-मुक्तीची पहिली पायरी कशी ?

(c) लोकसंख्यावाढीचे दुष्परिणाम कोणते ?

(d) विज्ञान तंत्रज्ञानाचे इष्ट परिणाम कोणते ?

8. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 4

Newton interpreted the riddle of the falling apple : 'The law of universe is the attraction of mass to mass.' In a crude and fragmentary form this law had been recognized for some time. People knew that weights fall to the Earth because of the gravity of the centre. But they did not know that this principle of gravity applies not only to the Earth but to the entire universe. From planet to planet and star to star, this interplay of mutual attraction keeps every particle of the universe rolling over its appointed orbit obeying the simple law of gravity.

9. खालील उताऱ्याचा सारांश लिहा : 4

भाषा हे भावना व विचार प्रकट करण्याचे प्रभावी साधन आहे. आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करावयाचा असेल, तर चांगले बोलता आले पाहिजे व चांगले लिहिताही आले पाहिजे. या दोन माध्यमांद्वारे आपण जे प्रकटन करतो त्यातून आपल्या व्यक्तिमत्त्वाची सकसता, उंची, खोली, समृद्धता समजते. उच्चारणातून संस्कार आणि लेखनातून व्यासंग, विद्वत्ता प्रकटते. लोकांच्या मनात आपले स्थान निश्चित होते. समाज पुरुष अनंत डोळ्यांनी आपल्याकडे पहात असतो. त्यासाठी आपली वाणी आणि लेखणी ओघवती व सिद्धहस्त हवी. नेत्यापासून अभिनेत्यापर्यंत आणि सामान्य गृहस्थापासून विक्रेत्यापर्यंत तुम्ही कुणीही व्हा, पण चांगल्या व परिणामकारक बोलण्या – लिहिण्यावर तुमचे यश अवलंबून आहे, हे विसरू नका, प्रभावी अभिव्यक्ती ही समृद्ध व्यक्तिमत्त्वाची निशाणी असते.

---